
UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९२ • मार्च २०२४ • पुरवणी विशेषांक १५




प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

॥ श्री विश्वनाथो विजयते ॥
स्थापना : १ जानेवारी १९२७

४६. मराठी कादंबरीतील बदलती भाषा

- श्री. विलास सखाराम सुर्वे ---------- १९७

४७. व्यंकटेश माडगूळकर यांचे कथाविश्व

- डॉ. नवनाथ गुंड ---------- २००

४८. 'झुंज' या स्वकथनातील बदललेली भाषा व संस्कृती

- १) श्री. देवीदास गेंदुजी मेटांगे, २) प्रा. डॉ. युवराज मानकर ---------- २०४

४९. दलित कविता: भाषा आणि शैली

- डॉ. सागर अशोक पाटील ---------- २०८

५०. दलित साहित्यामधील बदलती भाषा आणि संस्कृती

- डॉ.शैलजा श्रीधर शिंदे ---------- २११

५१. मराठी कादंबरीतील बदलती भाषा व संस्कृती: स्टॅला कादंबरीच्या अनुषंगाने

- डॉ. भक्ती गोविंद महाजन ---------- २१५

५२. मराठी ग्रामीण कादंबरीतील बदलती भाषा आणि संस्कृती

- डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे ---------- २१८

५३. मराठी शाब्द लोकसाहित्यातील बदलती भाषा व संस्कृती

- डॉ. कु.कोकिळा हनुमंत चांगण ---------- २२२

५४. ग्रंथालयात सोशल नेटवर्कींगचा वापर व जागरूकता

- प्रा.अनिल शिवाजी पाटील ---------- २२६

५५. मनुष्य के अस्तित्व को चित्रित करता उपन्यास 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' बदलती संस्कृति का परिचायक

- डॉ. हेमलता काटे ---------- २३१

५६. संस्कृति का बदलता रुप और लीलाधर जगूडी की कविता

- प्रो.(डॉ.)विनायक बापू कुरणे ---------- २३४

५७. हिंदी भाषा और काव्य का बदलता स्वरूप

- प्रा.अश्विनी जगदीप थोरात ---------- २३७

# मराठी ग्रामीण कादंबरीतील बदलती भाषा आणि संस्कृती

**डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे**
सहायक प्राध्यापक मराठी विभाग
कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज
९५५२५७७८४०

**गोषवारा:**

१९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, ख्रिस्त,जैन आदिवासी असे साहित्य प्रवाह मराठीत उदयास आले.१९७० च्या दशकात ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा उदय झाला. या चळवळीमुळे खेड्यातील बहुजन वर्गातील तरुण लिहू लागला. ग्रामीण भागातील विविध जाती जमाती असल्याने त्यांनी व्यापक असे ग्रामीण जीवन जाणीया आणि आपली भाषा याचे चित्रण केले. २००० च्या आसपास समाज जीवनामध्ये विविध अंगी सर्वच पातळ्यांवरे स्थित्यंतरे जाणवू लागली.या स्थित्यंतराचे प्रतिबिंब या काळामध्ये निर्माण होणाऱ्या सर्व साहित्यामध्ये प्रतिबिंबित झालेले दिसते. त्याचे आजचे ग्रामीण साहित्याचे चित्र हे कालच्या ग्रामीण साहित्यापेक्षा निश्चितच वेगळे आहे. या वेगळेपणाला बदलती सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक राजकीय स्थित्यंतरे कारणीभूत आहेत.

**बीज संज्ञा :** ग्रामीण ,आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, जागतिकीकरण

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेखनाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला गेला आहे.

**उद्दिष्टे :**

१. ग्रामीण मराठी कांदबरीतील बदलती भाषा आणि संस्कृती यांचा शोध घेणे.
२. १९९० नंतरच्या कादंबऱ्यांच्या आशयाचे निरीक्षण नोंदवणे
३. बदलत्या परिस्थितीनुसार ग्रामीण जीवनात झालेल्या परिवर्तनाचा शोध घेणे.

**प्रस्तावना :**

मात्र २००० नंतरच्या काळाचा विचार करता १९६० ते २००० पर्यंत चा काळ हा काहीसा स्थिर आणि फारसा भवया नव्हता अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न निर्माण झालेले दिसतात. भाषेची अस्मिता आणि अस्तित्वाचा प्रश्न धर्म जात वर्ग प्रदेशाचे वाढते प्रश्न वाढती गुन्हेगारी चंगळवादी वृत्ती पर्यावरणाचे अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या स्त्रियांचे शोषण शिक्षण व्यवस्थेमध्ये असलेला भ्रष्टाचार राजकारणामधील लोकांची स्वार्थी वृत्ती, भ्रष्टाचारी प्रवृत्ती, आरक्षणाचा प्रश्न त्यासाठी निघालेले विविध मोर्चे अनेक चळवळी, बालहत्या, महिलांवर घडणारे अनेक अत्याचार, पिळवणूक, दहशतवाद नक्षलवाद, भांडवलशाही वृत्ती, शहरी संस्कृतीचा ग्रामीण संस्कृतीवर होणारा प्रचंड मोठा परिणाम, परदेशीय कंपन्यांचे वाढते प्रमाण शेतकऱ्यांचे प्रश्न वाढती महागाई असे अनेक प्रश्न निर्माण होऊन समाज जीवनामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात ढवळाढवळ निर्माण झाली. याचे परिणाम २००० नंतरच्या कादंबरीमध्ये आपणाला पडलेले दिसतात एकूणच २००० नंतरच्या मराठी कादंबरीमध्ये अनेक नवे प्रश्न नवे ताणतणाव संघर्ष आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे बदलत्या सामाजिक जीवन जाणिवा यांचे चित्र कादंबरीमध्ये दिसून येते.

ग्रामीण जीवनात बदलत्या काळानुसार विविध बदल दिसून येतात स्वातंत्र्य काळामधील बलुतेदारी व्यवस्था ही पाठीमागे पडली लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार तंत्रज्ञान योग तंत्रज्ञान युगाचे आगमन वाढते औद्योगिकरण जागतिकीकरण खाजगीकरण यामुळे ग्राम पातळीवरील व्यावसायिक बलुतेदार यांचे धंदे बंद झाले आणि त्यामुळे तरुणांची बेरोजगारी वाढली दुष्काळामुळे शेतीत पिकण्याचे झाले. त्यामुळे दारिद्र्य कर्जबाजारीपणा वाढले खेड्यातून अनेक लोकांचे शहराकडे स्थलांतर झाले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले, खेड्यातील लोकांना आपले शोषण होत आहे, हे लक्षात आले. आणि याला जबाबदार असणाऱ्यांचा घटक किंवा ही जी परिस्थिती निर्माण होणारी जे वास्तव आहे या वास्तवाचा त्यांनी शोध घेतला. आणि मग त्यांच्या मनामध्ये एक संघर्ष विद्रोहाची भावना निर्माण झाली आणि या विद्रोहाच्या भावनेतूनच संघर्ष लोक एकत्र येऊन अनेक मोर्चे आंदोलने संघर्ष करू लागले.

ISSN No 2394-5990

**ग्रामीणता :**

१९६० नंतर मराठी साहित्यात जे अनेक नवीन प्रवाह निर्माण झाले, त्यामध्ये ग्रामीण साहित्य हा एक महत्त्वाचा प्रवाह मानला जातो. ही संकल्पना समजून घेत असताना ग्रामीण ही संकल्पना समजून घ्यावी लागते. ग्रामीण या शब्दातून ग्राम गाव खेडे इत्यादी गोष्टी आपल्या लक्षात येतात. गाव हे गावगाड्यावर आधारलेले असते. या गावगाड्यात शेतकरी अनुतेदार, बलुतेदार, फिरस्ते, दलित इत्यादींचा समावेश होता. हे सर्वच घटक ग्रामपातळीवर एकमेकांवर ती अवलंबून होते. खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती असून शेती करणारा शेतकरी त्याला शेती व गृहपयोगी वस्तू व अवजारे करून देणारे सुतार, लोहार, चांभार, कुंभार, तेली सोनार इत्यादी जाती किंवा व्यवसायिक सेवा पुरवणारे गावातील, रामोशी, धोबी, कोळी तर ग्रामपातळीवरती मनोरंजनाचे काम करणारे जोशी, पिंगळा इत्यादी जाती या सर्वच घटकांना ग्रामीण जीवनामध्ये अतिशय महत्वाचे स्थान होते. एकूणच ग्रामीण म्हणजे लोकांचे जीवन ग्रामीण भागातील लोकांच्या जगण्याची राहण्याची पद्धत होय.

बारोमास (२००२) ही सदानंद देशमुख यांची साहित्य अकादमी पुरस्कृत कादंबरी आहे या कादंबरीमध्ये जागतिकीकरणाचा शेती व्यवसायावर काय परिणाम झाला तसेच शेतकऱ्याची नवी पिढी शेती व्यवसायावर उदासीन का आहे शेतकरी कुटुंबातीलच नव्या आणि जुन्या पिढीचा संघर्ष तसेच शेती व्यवसायातील यश अपयश अशा अनेक घटकांवर चर्चा आहे असेच त्यांची तहान या कादंबरीमध्ये पाणी प्रश्नांची समस्या मांडली आहे. ग्रामीण भागातील पाणीटंचाईमुळे मूलभूत समस्या कशा पद्धतीने निर्माण होतात याचे चित्र केले आहे. या कादंबरीमध्ये शासकीय योजनांचा नोकरशाहीकडून उडणारा बोजवारा अशा विविध योजनांमध्ये आपापले हितसंबंध जोपासणाऱ्या वृत्ती प्रवृत्तीचे चित्रण तहान या कादंबरीमध्ये दिसून येते . कृषी संस्कृतीत ताकदही दूध सुद्धा फुकट वाटलं जायचं तिथे पाणी विकणे ही गोष्ट मनाला अस्वस्थ करणारी आहे या आजच्या वास्तव जीवनाचा परिपाक या कादंबरीमध्ये मांडला आहे तसेच शंकर सखाराम यांची एस इ झेड ही कादंबरी जागतिकीकरण आणि खाजगीकरण यामुळे भांडवली औद्योगिक प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी सरकार कारवाई करून भांडवलदारांना कसा फायदा करून देते. याचे चित्रण आले आहे. त्या विरोधात भूमिपुत्रांची आंदोलने होत आहेत या ज्वलंत सामाजिक प्रश्नावर ही कादंबरी आधारलेली आहे भांडवली आर्थिक राजकीय व्यवस्थेविरुद्ध भूमिपुत्रांचा न्याय लढा शोषक आणि शोषितांमधील अस्तित्वाच्या संघर्षाचे तीव्र रोग धारण करतो रवींद्र शोभणे यांची कोंडी १९९२ ही कादंबरी एक नवा विषय घेऊन येते या कादंबरीत नरखेड तालुक्यातील खरसोली या गावचे कथानं आले असून या कादंबरीमध्ये नागपूर सारख्या महानगराचेही दर्शन घडते. या कादंबरीत गणपत व कौसी या ग्रामीण कष्टकरांचे दैन्य व दुःखी जीवनाचे चित्रण आले आहे पाटलाच्या शेतात गहू पिकाचे मळणी करताना गव्हाच्या मशीनमध्ये गणपतीचे दोन्ही हात कापले जातात. मजुराचे हात म्हणजे त्याचं जीवन होय. गणपतचे दोन्ही हात गेल्यानंतर त्याचे संपूर्ण जीवन उध्वस्त होते. या गणपतच्या करूण कहाणी चे चित्रण रवींद्र शोभणे यांनी आपल्या कादंबरीत केले आहे. औद्योगीकरणामुळे आधुनिकीकरणामुळे भांडवलदारी अर्थव्यवस्थेमुळे आणि लोकशाहीमुळे आज ग्रामीण भागात असंख्य प्रश्न निर्माण झालेले आहेत. धूळपेरणी (२००१) या कादंबरीमध्ये सुशिक्षित ग्रामीण तरुणाच्या जीवनातील तुटलेपण, दुभंगलेपण, शिक्षण व्यवस्थेतील संघर्ष, त्यातील निरर्थकच्या पार्श्वभूमीवर आधुनिक जगातील शेतीचे वास्तव चित्र साकार होते. तर शेषराव मोहिते 'अस जगणं तोलाच' (१९९४) या कादंबरी मधून सावकार, दुष्काळ, भ्रष्टाचार, दलाल आणि सुस्तप्रशासन यांच्या मध्ये होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक याचे चित्रण येते. रमेश इंगळे उत्रादकर यांच्या 'निशाणी डावा अंगठा' या कादंबरी मधून सरकारी योजनांचा एक अन्वयार्थ लावलेला आहे लक्ष्मण गायकवाड दुभंग (२००५) या कादंबरीत नैसर्गिक आपत्तीत माणुसकी हरवलेल्या स्वार्थ समाज प्रवृत्तीचा वेध घेतला आहे. रौंदाळा (२००८ )या कृष्णात खो तांच्या कादंबरीने विस्तृत राजकारणाने स्थिर ग्रामव्यवस्थेत सांस्कृतिक आणि सामाजिक प्रश्न उपस्थित करून मूळच्या सहानुभाववादी ग्रामव्यवस्थेत घडवून आणलेला रौंदाळा हे मोठे सामाजिक स्थित्यंतर अधोरेखित करतो हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ २०१० या भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीत कृषी संस्कृतीच्या पराभवाची कथा कृषी व्यवस्थेतील अनेक स्थित्यंतरांना स्पर्श करते.जोहार (२०१५ )या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या आणि ती झालेल्या आणि चर्चा विषय ठरलेल्या कादंबरीत नपुसंक शिक्षण व्यवस्था बदलते ग्रामजीवन भ्रष्ट प्रसार माध्यमे परात्मे झालेली तरुण पिढी या संपूर्ण संबंध व्यवस्थेचा परिपाक जोहार मध्ये चित्रीत झाला आहे ब-बळीचा २०१२ या प्रयोगशील कादंबरीत भोगवादी भ्रष्ट समाज व्यवस्थेत कृषिजन संस्कृतीचे प्रश्न विविध पातळ्यांवर हाताळून इथल्या कृषी वल्लांच्या सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतराचा वेध राजन गवस यांनी घेतला आहे. अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट (२०११) या आनंद विंगकर यांच्या या कादंबरीने

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर शोषण व्यवस्थेच्या आरशाची सापडलेला अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा प्रश्न त्यांचे धोक्यात आलेले सामाजिक स्थान त्यांचे जीवनमान या कादंबरीमध्ये विस्तृतपणे मांडले आहे. पखाल (१९९५ ) या कादंबरीमध्ये बाबाराव मुसळे यांनी पाणी टाकणाऱ्या पाणक्या कोळ्यांची किती हे बिकट अवस्था झाली आहे. स्पष्ट होते. ग्राम जीवनाचे वास्तव चित्र उभा करणारे तसेच यांत्रिकीकरणाचा फटका या समाजाला किती बसला आहे हे या कादंबरीतून पाहायला मिळते. ग्रामीण जीवनातील शोषण दैन्यअवस्था यांचे ताणतणाव त्यांचा नायका करवी समाजवस्तव दाखवण्याचा ते प्रयत्न करतात. संतोष जगताप यांनी लिहिलेली विजेने चोरलेले दिवस या कादंबरीमध्ये कृषी संस्कृतीवर जगणाऱ्या शेतकरी वर्गाचे चित्र केले आहे. ग्रामीण भागात आजही वीज मिळत नाही. शेतकऱ्यांच्या विहिरीला पाणी नाही आणि जरी कदाचित पाणी असले तरी वीज उपलब्ध होत नाही. त्यामुळे पाणी असून पीक वाळलेलेच राहते. वीज गळती, चुकीच्या हंगामात ट्रान्सफॉर्मर जळणे, वीज कनेक्शन देणाऱ्या अधिकाऱ्यांशी वादविवाद, शेतकऱ्यांचा आपापसामध्ये होणारी भांडणं, विजेचे दर नक्की नसते. अशा अनेक कारणांनी शेतकऱ्याची होणारी कुचंबना याचे चित्रण या कादंबरीमध्ये आले आहे. अशोक कौतिक कोळी यांची पाडा ही कादंबरी खानदेशातील छोट्या केळी उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा मांडताना दिसते. वासुदेव मुलाटे यांची विषुववृक्षाच्या मुळ्या ही कादंबरी सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे विष गरीब शेतकऱ्यांना त्यांच्या विकास योजनांना कसे संपवते याचे चित्र मांडते. कृष्णात खोत यांची गावठाण, रौंदाळा, झडझिंबड धुळमाती, या कादंबऱ्यांनी पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची जगणे ग्रामीण राजकारण त्यामुळे निर्माण झालेला गुंता बदलत जाणारा गाववाडा ग्रामजीवन याचे चित्रण या कादंबरीमध्ये केले आहे.भारत काळे यांची ऐसे कुणबी गोपाळ (२००१) ही कादंबरी शेतीचा वाढलेला खर्च बाजारभावाचा फटका, संयुक्त कुटुंब व्यवस्थेची कमतरता, सरकारचे दुर्लक्ष निसर्गाची अवकृपा आणि शेतकऱ्यांना जागतिकीकरणाला सामोरे जावे लागत असल्याने कधीकाळी सधन असणारी शेतकरी कुटुंब आज विकट अवस्थेत जगताना दिसतात. मोहन पाटील यांची साखरपेरा (२००६) ही कादंबरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा मांडते. उसासारख्या नगदी पिकाच्या नादी लागून शेतकरी आपलेच नुकसान कसे करून घेतो याचे चित्र आले आहे.

**समारोप :**

अशाप्रकारे मराठी ग्रामीण कादंबरीतील बदलती भाषा आणि संस्कृतीचा विचार करत असताना ग्रामीण जीवन अगोदरच्या कालखंडाच्या तुलनेत बदललेले दिसून येते. या कादंबरीत ग्रामीण माणसाचे अंतरंग,त्याच्या वृत्ती प्रवृत्ती,ग्रामीण माणसांचा स्वभाव,माणसांच्या कुटुंबातील अनेक ताण तणाव, शहरी संस्कृतीचा पडलेला प्रभाव झालेले परिवर्तन हे दिसून येते. बदलते समाजजीवन, समाज संस्कृती, बदलते राजकारण, भाषा, धर्म,नैतिक मूल्यांचा ऱ्हास, बदलणारे समाजजीवन,सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये निर्माण झालेले विविध प्रश्न,संघर्ष क्रिया प्रतिक्रिया इत्यादी विषय कादंबरीमध्ये दिसून येतात. मराठी साहित्यातील कादंबऱ्यांमध्ये बदलती सामाजिक आर्थिक सांस्कृतिक स्थित्यंतराचे चित्रण सूक्ष्म चित्र आलेले आहे प्रामुख्याने शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर येतात शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख त्यांचे दारिद्र्य त्यांची अगतिकता त्यांच्या लाचारी ग्रामीण भागातील स्त्रीचे दुःख याचे चित्र आलेले दिसून येते . गाव गाड्यातील दलित दलितेत्तर यांच्यातील ताणतणाव दिसून येतो. तसेच ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्न, गाव पातळीवरचे राजकारण, राजकीय हस्तक्षेप, सरकारच्या योजनांचा भडीमार,पण लोकापर्यंत न पोहचलेल्या अनेक योजना यांचे चित्रण येते.काळ बदलला की ग्रामीण जीवनात आपोआपच आपोआप बदल झालेला दिसून येतो. या काळानुरूप बदललेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण काही कादंबऱ्यातून दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. ग्रामीण कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्नांचा समस्यांचा मुलगामी शोध घेतला आहे.
२. ग्रामीण साहित्याने स्वतःची ओळख निर्माण केली. या साहित्याला जागतिकीकरणाचा घेतला आहे.
३. गावगाडा, बलुतेदारी, एकत्र कुटुंब पद्धती या सोबत याचे चित्रण आले आहे.
४. १९९० नंतरच्या या अवस्थेतील आर्थिक राजकीय सामाजिक बदलाचा संदर्भ आहे.
५. आशयाच्या आणि अभिव्यक्तीच्या अंगाने अनेक प्रयोग
६. कृषी जीवन संस्कृतीचे चित्रण ग्रामीण साहित्याचा विशेष नाही तर अंगभूत लक्षण आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. वासुदेव मुलाटे: ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही
२) नागनाथ कोत्तापल्ले : ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध
३) यादव आनंद: ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या
४) डॉ. आनंद यादव: ग्रामीण साहित्य आणि वास्तव

ISSN No 2394-5990

५) संपा) प्रा चंद्रकुमार नलगे: ग्रामीण वाडमयाचा इतिहास
६) रवींद्र ठाकूर: मराठी ग्रामीण कादंबरी
७) देशमुख गणेश : ग्रामीण समाज जीवन व साहित्य
८) चंदनशिवे भास्कर: ग्रामीणत्वाचे नवे आयाम
९) भोसले द.ता : ग्रामीण साहित्य एक चिंतन

संदर्भ ग्रंथ :

६) डॉ. वासुदेव मुलाटे: ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही
७) नागनाथ कोत्तापल्ले : ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध
८) यादव आनंद: ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या
९) डॉ. आनंद यादव: ग्रामीण साहित्य आणि वास्तव
१०) संपा) प्रा चंद्रकुमार नलगे: ग्रामीण वाडमयाचा इतिहास
११) रवींद्र ठाकूर: मराठी ग्रामीण कादंबरी

■■■